# जिल्हा परिषद, गडचिरोली
## सामान्य प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र: ०७१३२-२९७४६३ Email :- zpgadmail@gmail.com

क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-१(ब)/अनुकंपा/१५५७ / २०२६ दिनांक :-०७/ ०९/ २०२६

# प्रेस नोट

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत गट-क व गट-ड मधील रिक्त असलेले विविध संवर्गाची पदे अनुकंपाधारक उमेदवारांमधून जेष्ठता, शैक्षणिक अर्हता व सामाजिक प्रवर्गानुसार भरण्याकरीता जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत दिनांक ३१.१२.२०२५ अखेरपर्यंत पूर्ण झालेल्या अनुकंपा प्रकरणाची तपासणी करून पूर्ण माहिती असलेल्या एकूण १९२ उमेदवारांची अंतिम प्रतिक्षासूची तयार करून जिल्हा परिषद, गडचिरोलीच्या **https://zpgadchiroli.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे फलकावर प्रकाशित करण्यात आलेली आहे.

अंतिम प्रतिक्षासूचीतील अनुकंपाधारकांची नेमणूक जेष्ठता, शैक्षणिक अर्हता तसेच सामाजिक प्रवर्गानुसार रिक्त असलेल्या गट-क व गट-ड च्या पदावर समुपदेशन प्रक्रियाव्दारे व पारदर्शकता ठेवून राबविण्यात येणार असल्याने अंतिम प्रतिक्षासूचीतील अनुकंपाधारकांनी केवळ दस्तऐवज पडताळणीच्या प्रक्रियेकरीता दिनांक २२/०९/२०२६ व २३/०९/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता बोलविण्यात येत आहे. सदर अनुकंपा पदभरती प्रक्रियेत उमेदवारांनी कोणत्याही आमीषाला / भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन मा. श्री.सुहास गाडे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी केले आहे.

दिनांक :- २२ सप्टेंबर, २०२६ (गट-क मधील उमेदवारांचा अनुक्रमांक १ ते ९६ पर्यंत.)
दिनांक :- २३ सप्टेंबर, २०२६ (गट-क मधील अनुक्रमांक ९७ ते १७६ व गट-ड मधील अनु. क्र. १ ते १६ पर्यंत)

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी,**
**गडचिरोली.**

उपरोक्त प्रेस नोट सर्व दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

07/09

**(अनिकेत पाटील)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.**